शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.५८/२०१८

| | | |
|---|---|---|
| श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. खेडूत शिक्षण मंडळ कालकुंद्री, चंदगड जि.कोल्हापूर.<br>२. र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड, जि.कोल्हापूर. | } | वि.प. |

खेडूत शिक्षण मंडळ, कालकुंद्री, चंदगड, जि.कोल्हापूर यांचे र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड, जि.कोल्हापूर येथील शिक्षक श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२२/०२/२०१८ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मे. विद्यापीठ न्यायाधीकरण यांचे आदेशानुसार मी सदर महाविद्यालयात दि.२१/०७/२०१७ रोजी रूजू झालो आहे. आणि नियमित नेमून दिलेले काम करीत आहे. मात्र सदर दिनांकापासून आजअखेर मला नियमानुसार देय असणारे वेतन मिळाले नाही. किंबहूना वेतनापोटी कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही. सबब थकीत वेतन व नियमित वेतन देणेबाबतचे आदेश सर्व संबधितांना व्हावेत.

**संस्थेचा अभिप्राय :**

वेतनपत्रकात नाव समाविष्ठ करण्याबाबत मा.शिक्षण सहसंचालक, उ.शि.कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना दि.१६/१२/२०१८ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सदर प्रस्ताव दि.२१/०३/२०१८ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. त्यांचे माहे मे, २०१८ पासून ऑनलाईन वेतन अदा करण्यात आले आहे. दि.०४/०८/२०१८ रोजी मा.शिक्षण सह.संचालक, कोल्हापूर यांचेकडे थकीत वेतनाचा प्रस्ताव सादर केला आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री.कुलकर्णी यांना मे.पुणे/कोल्हापूर विद्यापीठ ट्रॅब्युनल कोर्ट, पुणे यांच्या आदेशानुसार दि.२१/०७/२०१७ रोजी हजर झाल्याने मा.शिक्षण सहसंचालक, उ.शि, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये मे. विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे यांचे आदेशानुसार सदर महाविद्यालयात दि.२१/०७/२०१७ रोजी रूजू झालो. सदर दिनांकापासून अर्ज दाखल तारखेपर्यंत नियमानुसार देय असणारे वेतन मिळाले नाही. थकीत वेतन व नियमित वेतन मिळावे अशी तक्रार नमूद केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये संस्थेच्या कार्यकारी मंडळाबाबतचे प्रकरण प्रलंबित असलेने पगाराबाबतच्या बाबी प्रलंबित आहेत. तसेच तक्रारदार यांचे माहे मे, २०१८ पासून ऑनलाईन वेतन अदा करण्यात आले आहे व दि.२१/०७/२०१७ ते एप्रिल, २०१८ या कालावधीतील देय पगाराबाबत दि.०४/०८/२०१८ रोजी मा.शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर यांचेकडे थकीत वेतनाचा प्रस्ताव सादर केला आहे व हा प्रस्ताव त्या कार्यालयात प्रलंबित असल्याचे म्हटले आहे.

समितीसमोर तक्रारदार यांनी महाविद्यालयाने एप्रिल, २०१८ पासून आपणास पगार दिलेला आहे. परंतू तो नियमानुसार दिलेला नाही असे कथन केले. त्यामुळे या प्रकरणातील वाद हा तक्रारदार यांना दि.२१/०७/२०१७ ते एप्रिल, २०१८ या कालावधीतील नियमानुसार देय पगार संस्था व महाविद्यालयाने देण्याबाबत उपस्थित होतो.

१. तक्रारदार यांनी दि.२१/०७/२०१७ पासून ते एप्रिल, २०१८ पर्यंत महाविद्यालयातील कामकाज नियमित करून देखील त्यांना या कालावधीमधील कोणतेही वेतन मिळालेले नसल्याचे समितीच्या निदर्शनास येते. समितीसमोर संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांचे थकीत वेतनाचा प्रस्ताव मा.शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत आला असल्याचे लेखी व तोंडी सांगितले होते. सुनावणी दरम्यान तक्रारदार यांनी मा.शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे सदर वेतन प्रस्ताव शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे प्राप्त झालेला नसल्याचे संबधित कार्यालयाकडून कळाल्याचे कथन केले. तसेच याबाबत तक्रारदार यांनी दि.१६/११/२०२१ रोजीच्या पत्राने थकीत वेतन प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडून माहिती अधिकार अधिनियम २००५

अन्वये उपलब्ध केलेली कागदपत्रे समितीसमोर सादर केली. सदर कागदपत्रामध्ये र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड यांच्याकडून श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी यांच्या थकीत वेतनाचा प्रस्ताव मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत आलेला नसल्याचे प्राप्त कागदपत्रांवरून समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या उपरोक्त कालावधीमधील नियमानुसार देय थकीत वेतनाचा परिपुर्ण प्रस्ताव संबधित कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

२. संस्थेच्या कार्यकारी मंडळाबाबतचे प्रकरण मा.धर्मादाय आयुक्त व वरिष्ठ न्यायालयात प्रलंबित असलेने प्राचार्यांना दैनंदिन कामकाज व व्यवस्थापनाबाबत मुभा नसल्याचे महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी समितीसमोर कथन केले होते. या प्रकरणी विद्यापीठाच्या संलग्नता टी १ विभाग यांचेकडून कार्यालयीन माहिती मागविण्यात आली. प्राप्त माहितीच्या अनुषंगाने मा.धर्मादाय सहआयुक्तसो, कोल्हापूर विभाग यांचेकडील आदेशाची कागदपत्रे समितीसमोर प्राप्त झाली. सदर कागदपत्रांवरून संस्थेच्या कार्यकारी मंडळाबाबतचे संदर्भातील मा.धर्मादाय सहआयुक्तसो, कोल्हापूर विभाग यांनी चौकशी अर्ज क्रं. १/२०२० चे कामी दि.२५/०२/२०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये 'संस्थेच्या सुरळीत कामकाज व सुव्यवस्थापनेकरीता संबधित शाळा व महाविद्यालय यांचे प्राचार्य व मुख्याध्यापक यांना कामकाज करणेस मुभा राहील' असे आदेश केले आहेत. सदर न्यायनिर्णयानुसार संस्थेचे कार्यकारी मंडळाचे प्रकरण प्रलंबित असले तरी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी तक्रारदार यांचे थकीत वेतनाचा परिपुर्ण प्रस्ताव संबधित कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

३. तक्रारदार यांनी समितीकडे दि.१२/१०/२०२० रोजीच्या प्रतिज्ञापत्राव्द्वारे सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये १) मे.विद्यापीठ न्यायाधिकरण यांच्या न्यायनिर्णयाप्रमाणे त्यांना ०३/०८/२०१५ पासून सेवेत घेण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सदर तारखेपासून वेतन देणे आवश्यक आहे. तसे वेतन महाविद्यालयाने अदा केलेले नाही. २) दि.०१ मे, २०१८ पासून आता त्यांना वेतन अदा केले जात आहे. मात्र सदर वेतन सहाव्या वेतन आयोगाच्या सुरूवातीच्या वेतन दराने अदा केले जात आहे. त्यांना सहाव्या वेतन आयोगाचा लाभ दि.०१/०१/२००६ पासून पुढे दि.०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्या दराने वेतन अदा करणे आवश्यक आहे. मात्र तसे वेतन दिले जात नाही. ३) ते महाविद्यालयात १९९८ पासून पूर्णवेळ सेवेत आहेत. मात्र कॅसचा कोणताही लाभ देण्यात आलेला नाही असे नमूद केले आहे.

याबाबत समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी उपरोक्त सादर केलेले प्रतिज्ञापत्र हे तक्रार अर्जाचा भाग होऊ शकत नाही व त्याबाबत म्हणणे देण्याची संधी संस्था व महाविद्यालयास मिळत नाही. त्यामुळे तक्रार अर्ज सोडून अधिकच्या केलेल्या मागण्यांचा विचार या प्रकरणी करणे संयुक्तीक होणार नाही. तसेच तक्रारदार यांनी मे.विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्या अपिल क्रं. १४/२०१५ मधील दि.२१/०४/२०१७ रोजीचे आदेश तसेच मा.उच्च न्यायालयातील दाखल याचिकेचा अभ्यास केला असता तक्रारदार यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये मागणी केलेल्या बाबी या न्यायप्रविष्ठ असल्यामुळे तसेच वेतन देण्याची बाब शासन अखत्यारीत येते असे समितीच्या निदर्शनास आले.

करिता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रारदार यांच्या कथनानुसार त्यांच्या दि.२१/०७/२०१७ ते एप्रिल, २०१८ या कालावधीतील नियमानुसार देय असणाऱ्या थकीत वेतनाचा परिपुर्ण प्रस्ताव मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे सदर आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत तात्काळ पाठवावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाकडे सादर करावा.

झालेल्या निर्णयाच्या प्रति संबधितांना देवून तसे कळविणेत यावे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**दिनांक :** 04 FEB 2022

**सदस्य**
**(श्री.आर.बी.तुपे)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**सदस्य**
**(डॉ. व्ही. एन.शिंदे)**

**सदस्य**
**(डॉ.एन.बी.गायकवाड)**

**सदस्य**
**(श्री.ए.ए.कुलकर्णी )**

**सदस्य**
**(डॉ.एस.एस.महाजन)**

**अध्यक्ष**
**(श्री.एस.पी.कुलकर्णी)**